# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## फ प्रभाग समिती, निगडी - ४११ ०४४
## कार्यपत्रिका क्र. २
## सभावृत्तांत

दिनांक :- २८/४/२०१६ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची विशेष सभा गुरुवार दिनांक २८/४/२०१६ रोजी दु. १२.०० वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन अध्यक्षा

२. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

३. मा.जाधव साधना रामदास

४. मा.जाधव राहुल गुलाब

५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

६. मा.तानाजी विठठल खाडे

७. मा.बो-हाडे शुभांगी संजय

८. मा.भालेकर प्रविण महादेव स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.योगेश कडूसकर – क्षेत्रिय अधिकारी ,मा.वाघमारे विजय प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा,मा. इंगळे सतिश - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.घोडे प्रविण – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग , मा.नरोटे देवानंद – उपअभियंता, स्थापत्य मा.नरेश जाधव – कनिष्ट अभियंता स्थापत्य विभाग, मा.अशोक अडसूळे – उपअभियंता, विदयुत , मा.शिर्के धाकोजी, सहा.आरोग्याधिकारी मा.गाडेकर प्रभावती – कार्यालयीन अधिक्षक, इत्यादी.

मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

ठराव क्र. २ विषय क्र. १
दि. २८/४/२०१६ विभाग - आरोग्य फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. बो-हाडे शुभांगी संजय अनुमोदक: मा. बहिरवाडे नारायण सदाशिव

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी फ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र
क्र.फक्षेका/आ-२/कावि/२४६/२०१६, दिनांक २५/४/२०१६

देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दि.२/१०/२०१४ पासून केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपुर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र .२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ अभियान (नागरी) राबविण्याचे

ठरवून दि. २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शौचालये उपलब्ध नसलेल्या नागरीकांना वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच काही ठिकाणी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत. उघडयावर शौचास जाणा-यांचे प्रबोधन करुन त्यांना शौचालयांचा वापर करुन प्रवृत्त करण्यात येत आहे.

मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.मातवी/१२/कावि /९६ /२०१६, दि.१/४/२०१६ अन्वये कळविलेनुसार दि.२/१०/२०१७ पुर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे. त्यानुषंगाने फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क. ९ संभाजीनगर व प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी हे दोन प्रभाग दि. ३० एप्रिल २०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(ठाकरे मंदाकिनी अर्जुन)
अध्यक्ष
फ प्रभाग समिती,निगडी

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
फ प्रभाग कार्यालय, निगडी - ४४
जा. क्र. फक्षेका/सभा/कावि/५५/२०१६.
दिनांक : २८/४/२०१६

सही /-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
फ प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना